स्टाफ वेलफेअर समिती

प्रा.डॉ. सुभाष वाघमारे, संपादक

■ महाविद्यालयातील प्राध्यापक सेवक यांचे कल्याण व्हावे. एकमेकाच्या सुःख दुःखात आत्मीयतेने सहभागी व्हावे व सेवकांच्या हिताच्या दृष्टीने विचार विनिमय होऊन विधायक काही चांगले घडावे या दृष्टीने, स्टाफ वेलफेअर विभाग काम करतो. दरवर्षी कौटुंबिक सुख दुःखाच्या काळात सर्वजण सहभागी होतात. दरदिवशी मधल्या सुट्टीत चहापान कार्यक्रम आयोजित केला जातो. जन्म, मृत्यू, विवाह, नव्या चांगल्या घटना, दुःखद घटना यावेळी सर्वजण आपल्या संवेदना व्यक्त करतात. स्टाफ मधील सदस्यांचे मुला-मुलीच्या लग्न प्रसंगी १००० रू.ची भेट दिली जाते. स्टाफ सदस्याचे कुटुंबातील सदस्यांचे निधन झाले तर बैठक घेऊन श्रद्धांजली अर्पण केली जाते. सेवानिवृत्ती समारंभात १००० रुपयाची भेट वस्तू अगर पोशाख घेऊन सन्मान केला जातो. ■ या वर्षी उपप्राचार्य प्रा .आर. एस. पळे सर सेवानिवृत्त झाले. त्यांच्या सेवानिवृत्ती समारंभाचे आयोजन समितीने केले. डॉ.पी.बी. गायकवाड यांच्या कन्येच्या विवाहात प्राध्यापक प्रतिनिधी सहभागी झाले व शुभेच्छा देण्यात आल्या. प्रा.नीता साठे यांचा विवाह झाल्याने त्यांचे अभिनंदन करण्यात आले. डॉ .मानसी लाटकर यांच्या पुस्तकास 'पद्मगंगा' पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच डॉ.सुभाष कारेडे यांना दहा लाख अनुदान संशोधन साठी मिळाले म्हणून सत्कार घेण्यात आला. ■ ३१ जुलै २०१९ ला कार्यालयीन सेवक श्री .एस .के .पोटे यांची आई अंजना कृष्णा पोटे यांचे निधन झाले त्यावेळी श्रद्धांजली सभा आयोजित केली. या वर्षी कोल्हापूर, सांगली, सातारा येथे अतिवृष्टी झाल्याने महापूरामुळे नदीलगतच्या गावेच्या गावे पाण्याखाली गेली. संपत्तीचे नुकसान झाले. या संकटात महाविद्यालयात स्टाफ बैठक होऊन पूरग्रस्तांसाठी मदत म्हणून प्रत्येकी १००० रुपये देण्यास संमती दर्शवली व ही मदत कॉलेजच्या नावे देण्यात यावी असे ठरविले. एकूण ३९००० हजार रुपये एकत्र केले. त्यातून जीवनावश्यक साहित्य खरेदी करून पूरग्रस्तांना पाठविण्याची व्यवस्था करण्यात आली. या वर्षी राष्ट्रीय बंधुता साहित्य परिषद पुणे व सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय सातारा यांनी विद्यार्थी आणि शिक्षक साहित्य संमेलन आयोजित केले. या कार्यक्रमास २५ प्राध्यापक यांनी एकत्र येऊन १५० रुपये नोंदणी शुल्क भरून, संमेलनात सहभाग घेतला. २९ ऑगस्ट रोजी हा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भाऊसाहेब कराळे साहेब यांना कर्मवीर भाऊराव पाटील आदर्श रयत सेवक पुरस्कार मिळाला. स्टाफद्वारे सन्मानचिन्ह देऊन त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. याच कार्यक्रमात रयत शिक्षण संस्थेस देखील कर्मवीर भाऊराव पाटील क्रांतीदूत पुरस्कार देण्यात आला.५ सप्टेंबर रोजी समितीने शिक्षक दिन कार्यक्रम आयोजित केला.या वेळी मा.प्राचार्य डॉ.अरुण आंधळे यांचे हस्ते सर्व प्राध्यापक व सेवकांचा फूल देऊन सत्कार करण्यात आला.बी.ए भाग २ व बी.कॉम भाग २ अभ्यासक्रमित पुस्तक लेखन व संदर्भ ग्रंथ लेखन केल्याबद्दल प्रा.डॉ. एस.एम. भोसले व प्रा.डॉ. अनिल वावरे यांचा सत्कार करण्यात आला. प्रा. प्रकाश बळीराम गायकवाड यांना जायंट्स ग्रुप सातारा यांनी शिक्षकदिनी सन्मान केला. तसेच सातारा जिल्ह्यात उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी म्हणून द्वितीय क्रमांक मिळविल्याबद्दल शिवाजी विद्यापीठाने त्यांचा सन्मान केला त्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. प्रा.आनंद मारगम हे तैवान या देशातील तैपाई येथे जाऊन आंतराष्ट्रीय परिषदेस उपस्थित राहिले त्याबद्दल त्यांचा सन्मान केला. कृतिशील प्राध्यापक पुरस्कार डॉ धनाजी मासाळ यांनी मिळविला त्या बद्दल त्यांचा सन्मान केला. प्रा.रोशनहारा शेख, प्रा.सुभाष वाघमारे, प्रा.शामला माने, प्रा.सविता मेनकुदळे, प्रा. अनिता मगदूम यांनी पीएच.डी पदवी मिळविली त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. महात्मा गांधी भजनसंध्या कार्यक्रमामध्ये अनेक प्राध्यापक उपस्थित राहिले. डॉ.अरुणकुमार सकटे यांना प्राचार्य एन. आर. माने निष्ठावान गुणी रयत सेवक पुरस्कार मिळाला. तसेच छत्रपती शिवाजी कॉलेज विकास समितीवर प्रा.डॉ एस. बी. .झोडगे, प्रा.डॉ. सुभाष वाघमारे, सोमनाथ जाधव यांची निवड झाली त्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. प्रा.शगुफ्ता शेख व प्रा.काजल माने यांचा विवाह झाला त्यांचा सत्कार करण्यात आला. डॉ. अनिसा मुजावर यांना नात झाली आनंद प्रीत्यर्थ पेढे वाटले. डॉ.सविता मेनकुदळे, प्रा.डॉ. शामला माने डॉ.धनंजय नलावडे, इत्यादींनी पेढे देऊन आनद व्यक्त केला. वाहन खरेदी केल्याबद्दल ही पेढे खाऊन सर्वांनी आनंदात सहभाग घेतला. प्रा.डॉ. सुभाष वाघमारे राज्यस्तरीय निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविला त्यांचा फूल देऊन सत्कार करण्यात आला. शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र परिषद अध्यक्षपदी डॉ. अनिल वावरे यांची निवड झाली. त्यांचा गौरव करण्यात आला. ■ या वर्षी ज्युनिअर विभागात प्रा.सतीश मारुतराव देशमुख हे सेवानिवृत्त झाले. त्यावेळी त्यांच्या सेवानिवृत्ती कार्यक्रमाचे आयोजन करून सपत्नीक सत्कार करण्यात आला.श्री. देशमुख यांनी सर्वाना लेक व्ह्यू हॉटेल मध्ये भोजन दिले. श्रीकांत बापू ऐतवडे, व्यवसाय शिक्षण विभाग हे २९-२ -२०२० रोजी सेवानिवृत्त झाले. त्यांचा गौरव करण्यात आला. प्रा.डॉ. सुभाष वाघमारे यांच्या आई मैनाबाई वाघमारे यांचे २६ ऑक्टोबर रोजी हृदय विकाराने निधन झाले. त्यानाही श्रद्धांजली वाहण्यात आली. कार्यालयातील श्री एस.व्ही. शिंदे यांचे वडील विठ्ठल सखाराम शिंदे यांचे निधन झाले या वेळी श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. ■ वार्षिक गुणवत्तेत प्रा,डॉ.शिवाजी पाटील व प्रा.एस. व्ही कोळेकर. यांनी बेस्ट रीडर हा सन्मान मिळविला. गुणवंत प्राध्यापक

म्हणून प्रा,डॉ सुभाष कारंडे, व प्रा.बाळासाहेब वाघ यांचा सन्मान महाविद्यालयाने केला. तसेच श्री. दीपक बोतालजी व श्री. दत्ता कोळेकर यांचा गुणवंत सेवक म्हणून सन्मान केला. धनंजय नलावडे यांची रयत शिक्षण संस्थेच्या 'लाईफ वर्कर 'पदावर निवड झाली. त्याबद्दल स्टाफ वेलफेअर विभागाकडून त्यांचे अभिनंदन करण्यात आले. कोरोना काळात एकमेकांची आस्थेने विचारपूस केली. प्रा.डॉ. सुभाष कारंडे आणि प्रा.डॉ. सुभाष वाघमारे यांनी लेख लिहून जागृतीपर काम केले. डॉ. पी.बी.गायकवाड यांनी शासकीय बैठकीस उपस्थित राहून सूचनांचे प्रसारण केले. एकमेकांचे ज्ञान वाढविण्यासाठी प्राध्यापकांनी चांगले योगदान दिले प्रा.डॉ एस.बी. झोडगे व प्रा.डॉ अनिसा मुजावर यांची प्रोफेसर पदी निवड झाली. तसेच कमवा आणि शिका योजनेमध्ये उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल प्रा.राहुल वराडे पाटील यांना रयत शिक्षण संस्थेने आदरणीय बंडो गोपाळा मुकादम स्मृती पुरस्कार देऊन सन्मानित केले त्याबद्दल त्यांचाही सत्कार करण्यात आला. प्रताप शिंदे यांना नातू झाला त्यावेळी त्यांनी स्टाफला पेढे देऊन आनंद व्यक्त केला. ■ स्टाफ वेलफेअर समिती सदस्य प्रा डॉ. रोशनहारा शेख व प्रा डॉ. शामला माने यांनी कार्यक्रम आयोजनासाठी चांगले सहकार्य दिले. प्रोफेसर डॉ. अनिसा मुजावर यांनी प्रत्येक वेळी सतर्क करीत घडामोडीची माहिती देऊन सजग केले. प्राचार्य डॉ. भाऊसाहेब कराळे यांचे मार्गदर्शन वेळोवेळी लाभले.